Diploma Admission Date Extend

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२-६८५९७४३५६/४१०/४९२
ई-मेल – desk10@dtemaharashtra.gov.in वेबसाईट: https://dte.maharashtra.gov.in

क्रमांक:तंशिसं/पदविका प्रवेश वेळापत्रक/प्रवेशाचा सुधारित अंतिम दिनांक /२०२६/ ४३६ दिनांक : २५/०८/२०२६

शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करीता कॅप फे-या पुर्ण झाल्यानंरत रिक्त जागांवर संस्थास्तरीय प्रवेशासाठीचे वेळापत्रक

०१. प्रथम वर्ष पोस्ट एसएससी (दहावी नंतरचे) पदविका अभियांत्रिकी व तंत्रज्ञान / वास्तुकला अभ्यासक्रम

०२. थेट द्वितीय वर्ष पदविका अभियांत्रिकी व तंत्रज्ञान अभ्यासक्रम.

०३. प्रथम वर्ष पोस्ट एचएससी (बारावी नंतरचे) पदविका हॉटेल व्यवस्थापन व खाद्यपेय व्यवस्था तंत्रज्ञान अभ्यासक्रम

संदर्भ : तंत्रशिक्षण संचालनालयाचे वेळापत्रक क्र.

०१. तंशिसं/पदविका प्रवेश वेळापत्रक/दहावी नंतरचे प्रथम वर्ष पदविका/२०२६/कॅप फेरी/३२६, दि.०२.०७.२०२६

०२. तंशिसं/पदविका प्रवेश वेळापत्रक /२०२६/ थेट व्दितीय वर्ष पदविका/कॅप फेरी/३३८, दि.०८.०७.२०२६

०३. तंशिसं/पदविका प्रवेश वेळापत्रक / बारावी नंतरचे प्रथम वर्ष पदविका/२०२६/ एचएमसीटी_एससीटी कॅपफेरी/३५४, दि.१४.०७.२०२६

शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करीता पुर्णवेळ पोस्ट एसएससी (दहावी नंतरचे) पदविका अभियांत्रिकी व तंत्रज्ञान / वास्तुकला अभ्यासक्रम, प्रथम वर्ष पोस्ट एचएससी (बारावी नंतरचे) पदविका हॉटेल व्यवस्थापन व खाद्यपेय व्यवस्था तंत्रज्ञान अभ्यासक्रम तसेच बारावी व आयटीआय नंतरचे थेट द्वितीय वर्ष पदविका अभ्यासक्रम या अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी संदर्भ १ ते ३ नुसार प्रवेशाचे वेळापत्रक घोषित केले आहे. त्यानुसार पूर्ण शुल्क परताव्यासह प्रवेश रद्द करण्याच्या अंतिम दिनांकांनतर रिक्त राहिलेल्या जागांसाठी संस्थास्तरिय प्रवेश प्रक्रिया दिनांक १३.०८.२०२६ पासुन सुरु झालेली असुन त्यासाठीचा अंतिम दि.१४.०८.२०२६ घोषित केलेला आहे. आता या प्रवेशासाठी सदरचा अंतिम दिनांक सुधारित करण्यात येत असुन तो दि.१४.०९.२०२६ असा करण्यात येत आहे. यासाठीच्या संस्थास्तरीय प्रवेश प्रक्रिया संस्थेद्वारे घोषित वेळापत्रकानुसार पार पाडण्यात येतील. याकरीता विद्यार्थ्यांना नोंदणीची सुविधाही समांतररित्या उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

तसेच संदर्भीय १ ते ३ नुसार घोषित पदविका अभ्यासक्रमांसाठी शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठीच्या सर्व प्रकारच्या प्रवेशांसाठीचा अंतिम दिनांक १४.०९.२०२६ व संस्थांसाठी डेटा अपलोड करण्याचा (प्रवेशीत झालेल्या उमेदवारांचा तपशील) शेवटचा दिनांक १४.०९.२०२६ असा सुधारित करण्यात येत आहे, याची सर्व संबधितांनी नोंद घ्यावी.

( डॉ. प्रमोद नाईक )
प्र.संचालक
तंत्रशिक्षण महाराष्ट्र राज्य, मुंबई.